बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)

दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)

ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे





गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१४ गोंदिया | अंक ३९ | बुधवार,दि.०३ सप्टेंबर २०२५ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/104/2025-2027


# 'हैद्राबाद व सातारा' गॅझेट लागू करण्याच्या अटीवर आंदोलन मागे

**मुंबई :-** "आम्ही जिंकलो आहोत," असे मनोज जरांगे पाटील यांनी मंत्र्यांच्या उपस्थितीत मराठा आरक्षण आंदोलनकर्त्यांना सांगितले. मनोज जरंगे पाटील यांचे वकील सतीश माने शिंदे यांच्या विनंतीवरून, मुंबई उच्च न्यायालयाने पूर्वीच्या आदेशांचे पालन केल्यामुळे "मराठा आरक्षण' प्रकरण उद्यापर्यंत तहकूब केले. मनोज जरंगे यांनी मराठा आणि कुणबी हे एकच समुदाय असल्याचे सांगणारा जीआर जारी करण्यासाठी महाराष्ट्र सरकारला दोन महिन्यांची मुदत दिली.

मराठा आरक्षणासाठी मुंबईतील आझाद मैदानात आंदोलन करणारे मराठा नेते मनोज जरांगे पाटील आणि आंदोलकांनी न्यायालयाच्या आदेशाचे आणि पोलिसांनी आंदोलनासाठी दिलेल्या परवानगीचे सर्रास उल्लंघन केले आहे. तसेच, गेल्या तीन दिवसांपासून विनापरवानगी आंदोलन केले जात असल्याचे सकृतदर्शनी स्पष्ट झाले आहे. त्यामुळे, मुंबईकरांचे जीवन पूर्वपदावर आणण्यासाठी जरांगे यांच्यासह आंदोलनाच्या आयोजकांना मंगळवारी दुपारी चारपर्यंत परिस्थिती सुधारण्याची मुदत दिली होती.त्या आधीच सरकारने आंदोलन शमविण्याकरीता हैद्राबाद गॅझेट लागू करण्याचा निर्णय,सातारा गॅझेट महिनाभरात लागू करण्याचा निर्णय,मराठा व कुणबी एक असल्याचा निर्णय तांत्रिक बाबी तपासून जलदगतीने घेतला जाणार,आंदोलकांवरील केसेस मागे घेण्याचा शासन निर्णय,आंदोलनात बलिदान दिलेल्या आंदोलकांना शासकीय नोकरी देण्याचा निर्णय व मुंबईत आंदोलकांच्या वाहनांना आरटीओ कडून करण्यात आलेला दंड माफ करण्यात यावे आदी मागण्या मराठा आरक्षण उपसमितीने पुर्ण करण्याचे आश्वासन दिल्यानंतर जरांगेनी आंदोलन मागे घेण्याचे आश्वासन दिले आहे.

वैधानिक मागणीसाठी आंदोलन करण्याचा अधिकार असला तरी त्यासाठी मुंबईकरांना वेठीस धरण्याचा अधिकार नाही, असेही न्यायालयाने सुनावले.

पोलिसांनी जरांगे यांना आंदोलनासाठी केवळ एक दिवसाची परवागी दिली होती. तसेच, पाच हजार आंदोलक आणि १५०० वाहने मुंबईत आणण्याची अट घातली होती. आंदोलन शांततेत केले जाईल, अशी हमीही जरांगे यांनी दिली होती. परंतु, प्रसिद्धीमाध्यमांत प्रसिद्ध झालेल्या वृत्तांची दखल घेता जरांगे यांनी परवानगीनंतरही आंदोलन सुरू ठेवले आहे. एवढेच नव्हे, तर त्यांनी आंदोलन तीव्र करून राज्यभरातील लाखो मराठ्यांनी मुंबईत यावे, असे आवाहन केले आहे. शिवाय, पाच हजारांहून अधिक आंदोलक मुंबईत आले असून त्यांनी मुंबई विशेषकरून दक्षिण मुंबईतील रस्ते, शिवाजी छत्रपती महाराज स्थानक (सीएसएमटी) मंत्रालय, हुतात्मा चौक येथील रस्ते अडवले आहेत. त्यांनी ते नुसते अडवलेले नाहीत तर तेथे जेवण करणे, नाचणे, नैसर्गिक विधी करणे, खो-खो, कबड्डी, क्रिकेटसारखे खेळ खेळले जात आहेत. हे न्यायालयाचे आदेश आणि पोलिसांना दिलेल्या हमीचे सर्रास उल्लंघन आहे, असे न्यायालयाने म्हटले आहे.

जरांगे यांनी २९ ऑगस्टपासून मुंबईत सुरू केलेल्या आंदोलनाविरोधात केलेल्या जनहित याचिकेवर सोमवारी मुंबई उच्च न्यायालयात तातडीची सुनावणी झाली. "आंदोलन हाताबाहेर गेले आहे. आम्ही संयम ठेवला कारण काही तरी चांगल व्हावे, अशी आमची इच्छा होती," असे स्पष्ट करत पावसात आंदोलन करताय तर चिखलात बसण्याची तयारी ठेवा, असेही न्यायालयाने सुनावले.

मराठा आंदोलनामुळे मुंबईकरांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत असल्याने याचिकेवर तातडीने सुनावणी घेण्याची मागणी एमी फाऊंडेशनच्या वतीने दाखल केलेल्या याचिकेमध्ये करण्यात आली होती. याचिककर्त्यांची मागणी मान्य करत न्यायमुर्ती रवींद्र घुगे यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठासमोर तातडीची सुनावणी झाली.



## न्यायालयाच्या आदेशानंतर कडक कारवाई करणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



**कोर्टाच्या आदेशानुसार कारवाई केली जाईल असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. कोर्टाने कडक आदेश दिल्यानंतर आता कडक कारवाई करावी लागेल. सरकारला आडमुठेपणाची भूमिका घेता येत नाही. सरकार अहंकार ठेवत नाही. जो शक्य आहे तो मार्ग काढत आहोत. जर चर्चेला कोणी समोर आलं तर लवकर होईल. कायदेतज्ज्ञांनी आणि सुप्रीम कोर्टाने हा केंद्राच्या नाही तर राज्याच्या अखत्यारित असल्याचे स्पष्ट केले आहे.**

## ओबीसी प्रवर्गात आम्हाला दुसरे वाटेकरी नको : छगन भुजबळांचा इशारा



**आमच्यावर अन्याय झाला तर आम्ही देखील लाखोंच्या लोंढ्यासह मुंबईत दाखल होणार आणि आम्हाला कोणीही रोखू शकणार नाही, असा इशारा छगन भुजबळ यांनी दिला. तसेच ओबीसी प्रवर्गात अजून कोणत्याही जातीला आणू नका, असेही त्यांनी पत्रकार परिषदेतून म्हटले. मराठा समाज मागास नाही हे सुप्रीम कोर्टाने सांगितले. तसेच मराठा-कुणबी एकच मानणे हे सामाजिक मूर्खपणाचे असेही कोर्टाने म्हटले आहे. सामाजिक मागास नाही अशांसाठी व आर्थिकदृष्ट्या मागास असलेल्यांना ईडब्ल्युएस लागू करण्यात आले आहे. मराठा समाजाला जे काही दहा टक्के आरक्षण देण्यात आले आहे, ते देखील टिकवण्यासाठी कोर्टात लढाई सुरू आहे. आता यांची मागणी आहे की ओबीसी प्रवर्गातून आरक्षण द्यावे. मराठा समाज ज्यावेळी आला तेव्हा देशमुख कमिटी, बापट कमिटी व इतर दोन आयोगांनी नकार दिला. सुप्रीम कोर्टाने नकार दिला, उच्च न्यायालयाने नकार दिला. मुख्यमंत्र्यांच्या हातात काहीच नाही. शरद पवारांनी जे मंडल आयोगाने सांगितले त्याची फक्त अंमलबजावणी केली. आयोगाने मान्य केले तरच एखाद्या जातीला आरक्षण दिले जाते. मुख्यमंत्री किंवा कोणत्याही सरकारच्या हातात हे नसते. त्यामुळे फडणवीस यांना नाव ठेऊन काहीच होणार नाही, असे त्यांनी सांगितले.**

### आंदोलकांकडून नियमांचे उल्लंघन : महाअधिवक्ता वीरेंद्र सराफ

काही नियमांचे पालन करण्याच्या शर्थीवर आंदोलनास परवानगी देण्यात आली होती. तिथे कुणीही उघड्यावर घाण करू नये, वाहतुकीस अडथळा आणू नये, पोलिसांनी अटकाव करू नये, सायंकाळी ६ नंतर आंदोलन संपवून जागा रिकामी करावी, अशा अनेक अटीशर्ती घालूनच केवळ एका दिवसाची परवानगी दिली होती. राज्य सरकारने या आंदोलनातील मागण्यांचा विचार करण्याकरता एक समिती तयार केली आहे. त्या समितीच्या माध्यमातून मागण्यांचा विचारही सुरू आहे. तसेच आंदोलकांशी चर्चादेखील सुरू आहे. हमीपत्र देताना अटींचे पालन केले जाईल, असे आंदोलकांकडून सांगण्यात आले होते.

# पूर्व विदर्भात आज ओबीसींचे जिल्हाधिकारी कार्यालयावर धरणे आंदोलन

**नागपूरः-** मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गात आरक्षण देण्याच्या संभाव्य निर्णयाविरोधात नागपूर विभागातील ओबीसी संघटनांनी तीव्र विरोध दर्शवला आहे. ओबीसी आरक्षणाचे संरक्षण करण्यासाठी येत्या ३ सप्टेंबर रोजी नागपूर विभागातील सहाही जिल्ह्यांत एकदिवसीय मइशारा आंदोलनफ पुकारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मराठा आरक्षणासंदर्भात कोणताही अनुचित निर्णय झाल्यास, विराट मोर्चा आणि आमरण उपोषण करण्याची तयारीही ओबीसी संघटनांनी दर्शवली आहे.ओबीसी युवा अधिकार मंचचे मुख्य संयोजक उमेश कोर्राम यांनी सांगितले की, शासनाच्या प्रत्येक निर्णयावर ओबीसी संघटनांचे बारीक लक्ष असेल. जर ओबीसी आरक्षणाला कोणताही धक्का लागला तर त्याचा तीव्र प्रतिकार केला जाईल.

ओबीसीतून मराठा आरक्षणाच्या मागणीसंदर्भात नागपूर येथे नागपूर विभागातील सहा जिल्ह्यांमधील ओबीसी संघटनांची एक महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत ओबीसी आरक्षणाच्या संरक्षणासाठी आवश्यक उपाययोजनांवर विचारविनिमय करण्यात आला. कोणत्याही परिस्थितीत मराठा समाजाला असंविधानिक पद्धतीने ओबीसी प्रवर्गात आरक्षण देऊ नये, असा ठराव या बैठकीत एकमताने मंजूर करण्यात आला.ओबीसी आरक्षणाला धक्का लागल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल,असे ठरविणयात आले.

या बैठकीत उमेश कोर्राम, खेमेंद्र कटरे, रोशन उरकुडे, गोपाल, सेलोकर, अशोक लांजे,प्रभाकर वैरागडे, समीक्षा गणेशे, भूमेश शेंडे, सी.डी चौधरी, श्रावण फरकाडे, मनोज चव्हाण, जयंत झोडे, तुळशीराम बोंद्रे, एस आर पडोळे, सुभाष पाल, पी.एम समरीत, बादल कामबडी, डॉ.तेजस्विनी बेले, भाऊराव वंजारी, सुहास धमगाये, लोकमान्य बर्डे, चक्रधर पारधी, आशुतोष लांबट, तिलक खवास, राहुल तिखट, मनोज वानखेडे, कुलदीप सोनकुसरे, रमण शिवणकर, मनीष गिरडकर, धीरज भिशीकर, विकास चुटे, अमित हिंगणकर, कृतल आकरे, प्रतीक बावनकर, पियुष आकरे, शुभम तिखट, प्रतीक इंगळे, खेमराज मेंढे, संजीव भुरे, रवींद्र मानकर यांच्यासह नागपूर,भंडारा,गोंदिया ,आमगाव,लाखांदूर,वडसा,सडक अर्जुनी,गडचिरोली,चंद्रपूर आणि वर्धा जिल्ह्यातील विविध ओबीसी संघटनांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## प्रमुख मागण्या आणि भूमिका

**शासनाने तात्काळ जातीनिहाय जनगणना करावी.५०% आरक्षणाची मर्यादा हटवून लोकसंख्येच्या प्रमाणात सर्वांना आरक्षण द्यावे. शासनाने मराठा आंदोलकांच्या दबावाखाली कोणताही निर्णय घेऊ नये आणि ओबीसींच्या आरक्षणाचे रक्षण करावे.**

## धान खरेदी योजनेसाठी ई-पीक पाहणी बंधनकारक

**भंडारा:** हंगाम २०२५-२६ साठी केंद्र सरकारच्या किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत शेतकऱ्यांकडून धान्य व भरडधान्य खरेदी करण्यात येणार आहे. या योजनेअंतर्गत जिल्हा पणन कार्यालय उपअभिकर्ता संस्थामार्फत ही खरेदी केली जाणार आहे. संपूर्ण खरेदी प्रक्रीया ऑनलाईन, पारदर्शक आणि कार्यक्षम पद्धतीने राबविण्यात येणार असून त्यासाठी ई- पिक पाहणी अनिवार्य केली आहे.जिल्ह्यात खरिप व रब्बी हंगामात मोठ्या प्रमाणात धानाचे उत्पादन घेतले जाते. शेतकऱ्यांच्या उत्पादित धानाला हमीभाव मिळावा.

## लोखंडी पाईप घेऊन जाणाऱ्या ट्रकला अपघात

**गोंदिया:-** लोखंडी पाईप घेऊन जाणारा ट्रक अनियंत्रित झाल्याने झालेल्या अपघातात चालकाचा जागीच मृत्यू झाल्याची घटना गोंदियाच्या गोरेगाव तालुक्यातील मुंडीपार जवळील लिंब पुलाजवळ आज, पहाटे १.३० वाजताच्या सुमारास घडली.संजय शहारे (३९) रा.चोपा ता. गोरेगाव, हल्ली मुक्काम रायपूर असे मृत ट्रक चालकाचे नाव आहे.

मृत संजय हा रायपूर वरून ट्रकमध्ये लोखंडी पाईप भरून आपल्या गावी चोपा आला होता. व तिथून एकटाच मुंबईसाठी निघाला होता. दरम्यान, मुंडीपार गाव ओलांडताच जंगल परिसरात संजय चे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने रस्त्याच्या कडेला जाऊन ट्रक उलटल्याने त्याचा ट्रक खाली दबून जागीच मृत्यू झाला. मंगळवारी पहाटे घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळ गाठून पंचनामा केला व स्थानिकांच्या मदतीने मृतदेह बाहेर काढले. घटनेची नोंद गोरेगाव पोलिसांनी केली असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# जनगणनेसाठी हवेत १४ हजार कोटी रुपये

## रजिस्ट्रार जनरलने केली सरकारकडे मागणी

**नवी दिल्ली:** बऱ्याच काळानंतर देशाची रजिस्ट्रार जनरलने केली सरकारकडे मागणी अधिकृत लोकसंख्या किती हे मोजले जाणार आहे. ही जनगणना २०२७ मध्ये केली जाणार असून यासाठी भारताच्या रजिस्ट्रार जनरल (ठऋख) यांनी केंद्र सरकारकडे १४ हजार कोटीहून अधिक निधीचा मागणी केली आहे.

ही जनगणना २०२७ मध्ये केली जाणार असून यासाठी भारताच्या रजिस्ट्रार जनरल (ठऋख) यांनी केंद्र सरकारकडे भरमसाठ निधीचा मागणी केली आहे. २०२७ च्या जनगणनेसाठी १४,६१८.९५ कोटी रुपयांच्या बजेटची मागणी करण्यात आली आहे. ही जनगणना देशातील पहिली डिजिटल जनगणना असणार आहे. यात जातीविषयीदेखील माहिती असेल. खर्च वित्त समिती (ईएफसी) ही अर्थ मंत्रालयाच्या अंतर्गत येणारी एक केंद्रीय संस्था आहे. ही संस्था सरकारी योजना आणि प्रकल्पांचे मूल्यांकन करते आणि तो परवडणारा आहे की नाही यावर मंजुरी देते. या ईएफसीकडे जनगणना करणाऱ्या आरजीआयने मंजुरीसाठी एकूण खर्च कळिवला आहे.

ईएफसीकडून मंजुरी मिळाल्यानंतर आरजीआय गृह मंत्रालय आणि केंद्रीय मंत्रिमंडळाच्या मंजुरीसाठी प्रस्ताव सादर करेल. यासर्वांची मंजुरी मिळाल्यानंतस्च जनगणनेला वेग येणार आहे. एप्रिल ते सप्टेंबर २०२६ या कालावधीत घरांची यादी करण्याचे काम आणि फेब्रुवारी २०२७ मध्ये लडाख,जम्मू आणि काश्मीर, हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंड वगळता देशभरात सुरू होणारी लोकसंख्या गणना अशा दोन टप्प्यांत ही जनगणना केली जाणार आहे. घरीही करताना तेची माहिती गोळा केली जाणार आहे. मोबाइल ॲप्लिकेशनद्वारे हा डेटा गोळा केला जाणार आहे. महत्त्वाचे म्हणजे देशाचे नागरिक त्यांची माहिती स्वतः अपलोड करू शकणार आहेत. यासाठी काही अटी, नियम असणार आहेत. यासाठी जनगणना देखरेख आणि देखरेख प्रणाली (CMMS) ही वेबसाइटदेखील विकसित केली जात आहे

# रेल्वे स्थानकावर भीषण आग! अपघात मदत व्हॅन जळून खाक

**गोंदिया:-** रेल्वे स्थानकावरील फलाट क्रमांक ३ वर उभ्या असलेल्या अपघात मदत वैद्यकीय व्हॅनच्या कोचला अचानक आग लागल्याची घटना मंगळवारी (दि.२) सकाळी १०:३० वाजताच्या सुमारास घडली. काही क्षणात आग वाढल्याने कोचमधील साहित्य व सीट जळून राख झाल्या.रेल्वे कर्मचाऱ्यांनी वेळीच उपाययोजना करीत आग आटोक्यात आणल्याने मोठी दुर्घटना टळली. मात्र या घटनेमुळे गोंदिया रेल्वे स्थानकावर काही वेळ तारांबळ उडाली होती.रेल्वेस्थानकाकडे जाणार्या रस्त्यावर दोन्हीकडून फुटपाथ दुकानदारांनी अतिक्रमण केल्याने अग्निशमन वाहन वेळेवर रेल्वेस्थानक परिसरात पोचलेच नाही.

प्राप्त माहितीनुसार गोंदिया रेल्वे स्थानकावरील फलाट क्रमांक ३ वर नेहमी अपघात मदत वैद्यकीय व्हॅन उभी असते. मंगळवारी सकाळी १०:३० वाजताच्या सुमारास या व्हॅनच्या एका कोचमधून धूर निघत असल्याने रेल्वे स्थानकावर उभ्या असलेल्या प्रवाशांना दिसले. तसेच हा प्रकार रेल्वे स्थानकावरील कर्मचाऱ्यांच्या लक्षात येताच त्यांनी अपघात मदत व्हॅनकडे धाव घेतली. अग्निशामक यंत्र व पाण्याचा मारा करुन कोचला लागलेली आग विझविण्यासाठी प्रयत्न सुरु केले. काही वेळातच आग आटोक्यात आली. मात्र आगीमुळे कोचमधील संपूर्ण सीट्स आणि वैद्यकीय मदतीचे साहित्य काही प्रमाणात जळाल्याने नुकसान झाले. मात्र या घटनेमुळे रेल्वे स्थानकावर काही वेळ तारांबळ उडाली होती. कोचला लागलेली आग आटोक्यात येईपर्यंत या फलाटावर येणाऱ्या रेल्वे गाड्या दुसऱ्या फलाटावर वळिवण्यात आल्या होत्या. या घटनेत सुदैवाने कुठलीही जीवीत हानी झाली नाही. या घटनेमुळे काही हावडाकडून मुंबईकडे जाणाऱ्या गाड्या काही वेळ आऊटवर थांबविण्यात आल्या होत्या. आग पुर्णपणे आटोक्यात आल्यानंतर काही वेळातच रेल्वे वाहतूक सुरळीत करण्यात आली.



## शार्ट सर्कीटमुळे आग लागल्याचा अंदाज

**गोंदिया रेल्वे स्थानकाच्या फलाट क्रमांक ३ वर उभ्या असलेल्या अपघात मदत वैद्यकीय व्हॅनच्या कोचला शार्ट सर्कीटमुळे आग लागून या आगीने काही वेळातच रौद्ररुप धारण केल्याने कोचमधील संपूर्ण सीट जळून राख झाल्याचे बोलल्या जाते. तर वैद्यकीय मदतीसाठी ठेवलेल्या सामानाचे सुध्दा नुकसान झाल्याची माहिती आहे.**

## तर घडला असता मोठा अनर्थ

**अपघात मदत वैद्यकीय व्हॅनमध्ये वैद्यकीय उपचाराचे साहित्य, ऑक्सिजन सिलिंडर, गॅसबत्ती व इतर मदतीचे साहित्य ठेवले होते. कोचला लागलेली आग वेळीच आटोक्यात आली नसती तर मोठा अनर्थ घडला असता. रेल्वे स्थानकावर उभ्या असलेल्या प्रवाशांना सुध्दा याची झळ बसली असती.**

# गोंदिया-इंदोर-बंगलोर विमानसेवा १६ सप्टेंबरपासून






**गोंदिया:-** बिरसी विमानतळामध्ये एअर स्टारने पुनरागमन केले आहे. एअर स्टारची गोंदिया-इंदूर-बंगलोर विमानसेवा १६ सप्टेंबरपासून सुरू होणार असून आठवड्यातून तीन दिवस उड्डाण भरणार आहे.याकरीता स्टार एअरच्या अधिकाऱ्यांनी गोंदिया विमानतळाची सोमवारला पाहणी करीत तिकिट काऊंटरकरीता जागा निश्चित केली.त्यातच बालाघाटच्या खासदार भारती पारधी यांनी गोंदिया-दिल्ली विमानसेवेची मागणी केली आहे.

बिरसी विमान तळावरून इंडिगोची गोंदिया-हैदराबाद विमान सेवा सुरू आहे. शेकडो नागरिक हैदराबादमार्गे मुंबई, दिल्लीसारख्या शहरांमध्ये प्रवास करत आहेत. त्यातच इंदूरच्या देवी अहिल्याबाई होळकर विमानतळाने रविवारपासून पुढील सहा महिन्यांसाठी वेळापत्रक लागू केले आहे.

फ्लाय बिग एअरलाइन्सने बंद केलेली इंदूर-गोंदिया विमान सेवा स्टार एअर एअरक्राफ्ट कंपनी पुन्हा सुरू करत आहे. स्टार एअर यामध्ये पुनरागमन करत आहे आणि गोंदियासाठी २९ ऑगस्ट रोजी वेळापत्रक जारी केले.त्यानुसार १६ सप्टेंबर ही उड्डाणाची तारीख निश्चित करण्यात आली आहे. प्रवासासाठी बुकिंग प्रक्रिया सुरू झाली आहे. गोंदिया-इंदूर भाडे २५०० रुपयांपासून सुरू होते. उड्डाणे आठवड्यातून तीन दिवस मंगळवार, बुधवार आणि शुक्रवार या दिवसी राहील. या संदर्भात, गोंदियाच्या बिरसी विमानतळाचे विमानतळ अधिकारी वर्मा यांनी पुष्टी केली आहे.स्टार एअरची विमासेवा इंदूर येथून सायंकाळी ५ वाजता विमान उड्डाण भरेल व सायंकाळी ५.५५ वाजता गोंदिया विमानतळावर उतरेल. तसेच गोंदिया येथून सायंकाळी ६.२५ वाजता उड्डाण भरेल व संध्याकाळी ७.३० वाजता पोहचेल.

# दिव्यांग कल्याण विभागाची कार्यालये सुरु होणार

**गोंदिया :-** राज्यातील सर्वत्र जिल्ह्यात दिव्यांग नागरिकांच्या समस्या सोडवून त्यंना सक्षम करण्यासाठी दिव्यांग विभागाची सर्वच जिल्ह्यात स्वतंत्र कार्यालये सुरु होणार आहेत. दरम्यान आतापर्यंत १३ कार्यालये सुरु करण्यात आलली असून या कार्यालयांचा अतिरिकत कारभार जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी यांच्याकडे सोपविण्यात आलेला आहे.

समाजकल्याण विभागाकडून दिव्यांग कल्याण विभागाचे स्वतंत्र झाला आहे. मात्र, गेल्या काही वर्षापासून या विभागाची स्वतंत्र विभागीय आणि जिल्हास्तरावर कार्यालये नसल्यामुळे या विभागातील प्रादेशिक उपायुक्त आणि जिल्हास्तरावरील जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांच्यामार्फत हाताळण्यात येत होता. दरम्यान दिव्यांग विभाग हा विषय संवेदनशिल असल्याने क्षेत्रीय स्तरावरील त्या विभागाची कार्यालये लवकरात लवकर सुरु करणे आवश्यक होते. शासनाच्या शंभर दिवस कृती आराखड्यामध्ये देखील जिल्हा कार्यालये सुरु करण्याबातचे आदेश देण्यात आले होते. त्यानुसार विभागातंर्गमत कार्यरत असलेले वेद्यकीय सामाजिक कार्यकर्ता व अधिक्षक गट-२ यांच्याकडे जिल्हा दिव्यांग

सक्षममीकरण अधिकारी पदाचा अतिरिक्त पदाचा कार्यभार देण्यात आला आहे. त्यानुसार पहिल्या टप्प्यात राज्यातील १३ जिल्ह्यात मे महिन्यात जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी कार्यालये सुरु करण्यात आली आहेत.

दिव्यांग कल्याण विभागाचे उद्दिष्ट म्हणजे दिव्यांगाचे कलयाण, शिक्षण, सक्षमीकरण आणि समावेशासाठी असालेल्या शासकीय योजना कार्यक्रम आणि उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करणे अशी आहे. दिव्यांग नागरिकाना विविध सेवा मिळण्यात अडचणी येतहोत्या. त्यामुळे जिल्हा स्तरावर सध्या १३ कार्यालये सुरु करण्यात आली आहेत. या कार्यालयांमुळे दिव्यांग व्यक्तीना विविध योजनांचा लाभघेणे सोयीचे होणार आहे. शिवाय दिव्यांग कल्याणासाठी कार्यरत असलेले विविध विभागा, स्थानिक प्रशासन आणि स्वयंसेवी संस्था यांच्यात समन्वण साधून दिव्यांगाच्या समस्या, अडचणी सोडविणे सुलभ होणार आहे. दरम्यान मे महिन्यात सुरु झालेल्या १३ कार्यालयांमुळे काही प्रमाणात दिव्यांग नागरिकांचे कामे होत असल्याचे दिसून आले आहेत. त्यामुळे उर्वरित सर्वच जिल्ह्यात जिल्हा कार्यालये सुरु करण्यात येणार आहेत. असे आदेश दिव्यांग कल्याण विभागचे सचिव तुकाराम मुंढे यांनी काढले आहे.



## २०२३ पदे नव्याने मंजूर

**दिव्यांग विभागाच्या कामकाजासाठी मंत्रिमंडळाने २०६३ पदे नव्याने मंजूर करण्यात आली आहेत. त्यापैकी मंत्रालयीन प्रशासक विभागासाठी ४२ पदे आहेत. तसेच विभागाच्या क्षेत्रीय स्तरावर प्रादेशिक, जिल्हा, तालुका स्तरावरील क्षेत्रीय कार्याल्याकरिता १९९६ पदे निर्माण करण्यात आली आहेत.**


ओबीसींचे धरणे आंदोलन
ओबीसी मधून मराठा समाजाला आरक्षण नको
या प्रमुख मागणीसाठी निदर्शन आंदोलन

स्थळ : जिल्हाधिकारी कार्यालय समोर, गोंदिया
बुधवार, दि. 03 सप्टेंबर 2025 सकाळी 11 ते 3
विनीत - सर्व ओबीसी संघटना, गोंदिया

## संपादकीय

# जरांगेंची बोलभाषा असंवैधानिक

मराठा समाजाला सरसकट कुणबी दर्जा आणि आरक्षण द्या, अशी मागणी करत मनोज जरांगे यांनी समाजबांधवांना मुंबईच्या दिशेने कूच करण्यासाठी आवाहन केले आहे. आता २९ ऑगस्ट रोजी मुंबईत मुख्यमंत्र्यांच्या घराबाहेरच आंदोलन करू, असा इशारा मनोज जरांगे यांनी दिला आहे. मुख्यमंत्र्यांना धमकीवजा इशारा देताना त्यांच्या आईचा उल्लेख करत जरांगेंनी काही शब्दांचा वापर केला. जरांगेंच्या या वक्तव्यावरुन वादाला तोंड फुटले आहे. हे शब्द अपशब्द असल्याचे खुद्द मराठवाड्यातूनच बोलले जात आहे.

परस्त्रीला मातेचा दर्जा द्या, अशी शिकवण श्री छत्रपती शिवाजी महाराज यांनी दिली होती. त्या शिकवणीचे जो पालन करणार नाही, तो छत्रपती शिवरायांच्या मार्गक्रमणावर चालणाराच नसतो. छत्रपती शिवाजी महाराज यांची शिकवण नितांत गरजेची आहे. त्यामुळे त्यांच्या शिकवणीचे अनुकरण प्रत्येकाने केले पाहिजे, असा सूर मराठवाड्यातून उमटत आहे. तसेच मनोज जरांगे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आईबद्दल बोललेले अपशब्द खरोखरच निंदनीय आहे, अशी प्रतिक्रिया खुद्द मराठा समाजातूनच व्यक्त होत आहे. याबरोबरच 'मुंबईला चला' अशी घोषणा करताना सरकार उलथवून टाकू, अशी भाषा वापरून मनोज जरांगे यांनी राजकीय नेतृत्वाला डिवचले आहे.

महाराष्ट्रात झालेल्या विधानसभा निवडणुकीत मनोज जरांगे यांनी कशाप्रकारे यू-टर्न घेतला हे संपूर्ण महाराष्ट्राने पाहिले. त्यामुळे आंदोलनाची भाषा करणाऱ्या मनोज जरांगे यांना मराठवाड्यातून खरोखरच पाठिंबा मिळत आहे का? हा एक संशोधनाचा विषय होऊन बसला आहे. शरद पवार यांचे उभे आयुष्य राजकारणात गेले. त्यांनी कधीही मराठा समाजाला आरक्षण मिळवून दिलेले नाही. १९९४ मध्ये ओबीसी आरक्षणाबाबत शरद पवार यांनी घेतलेला निर्णय मराठा समाजाला लाभदायक नव्हता. एवढेच नव्हे तर महाराष्ट्रातील राजकारणाचा इतिहास पाहिला तर सर्वाधिक काळ मराठा समाजाच्या हातात सत्ता होती.

मराठवाड्यातून विलासराव देशमुख तसेच अशोकराव चव्हाण यांनी राज्याचे मुख्यमंत्रीपद भूषविले. त्यांनी मराठा समाजाला कितपत न्याय दिला याचे अवलोकन मनोज जरांगे यांनीच करावे, अशीही प्रतिक्रिया ओबीसी समाजामधून उमटत आहे. मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून मनोज जरांगे यांना शरद पवार यांच्याकरवी पुढे केले जात आहे, असे मराठवाड्यात बोलले जात आहे. मनोज जरांगे यांना त्यांच्याकडून रसद पुरवठा होत आहे की काय? अशी शंका घेण्याइतपत मराठवाड्यात चर्चा होत आहे.

राज्यात तसेच देशभरात मराठा समाजाचे अनेक सेवानिवृत्त न्यायाधीश आहेत. तसेच अनेक दिग्गज वकील मंडळीदेखील मराठा समाजातूनच आहेत. मराठा आरक्षणाविषयी कायदेशीर असलेली गुंतागुंत किंवा यामधून कसा कायदेशीर मार्ग काढता येईल याबाबत मनोज जरांगे यांनी चर्चा करून त्याविषयी आपली भूमिका स्पष्ट करावी किंवा कायदेशीर मुद्द्यांवर हा लढा लढावा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे कायद्याच्या चौकटीत बसतील असे नियम व निर्णय घेत आहेत.

राज्याचे प्रमुख म्हणून मुख्यमंत्री फडणवीस हे कुठे चुकत असतील तर त्यावर कायदेशीर लढाई करावी किंवा तसे मुद्दे समोर आणावेत जेणेकरून मराठा समाजातील संपूर्ण नेते तसेच संपूर्ण समाज मनोज जरांगे यांच्या पाठीशी उभा राहील. भारतीय संविधानाला अनुसरून किंवा कायद्याच्या चौकटीत टिकेल असे आरक्षण कशा पद्धतीने आणता येईल हे देखील मनोज जरांगे यांनी पुराव्यानिशी सरकारकडे सादर केल्यास ओबीसी समाज कदाचित त्यांना त्याबाबत विरोधही करणार नाही,अशी मराठवाड्यातील ओबीसी समाजाची भूमिका आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे मराठेतर असल्यामुळे त्यांच्यामागे वेगवेगळ्या आंदोलनाच्या माध्यमातून त्रास देण्याचे राजकारण मराठवाड्यातूनच पेटत आहे, असे राजकीय विश्लेषकांचे मत आहे. 'गोरगरीब समाज बांधव' या गोंडस नावाखाली मनोज जरांगे हे मराठा समाजातील नागरिकांची दिशाभूल करीत आहे. त्यामुळेच मराठवाड्यात ग्रामीण भागात मराठा विरुद्ध ओबीसी असे गढूळ वातावरण निर्माण होत आहे.

मराठवाड्यातील जालना व बीड जिल्ह्यातून या आंदोलनाची धग सुरू झाली. बीड जिल्ह्यातील गेवराई येथे सोमवारी प्रचंड राडा झाला. त्यामुळे राजकीय वातावरण तापले. ओबीसी नेते प्रा. लक्ष्मण हाके यांच्यासह दोन्ही गटातील १४ जणांवर गेवराई पोलिसांनी गुन्हा दाखल केला. त्या राड्याच्या पार्श्वभूमीवर कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी मराठवाड्यात पोलीस यंत्रणा सतर्क आहे. शिवनेरीवर छत्रपती शिवरायांचे दर्शन घेऊन मराठा मोर्चाला प्रारंभ करण्यात येईल, अशी घोषणा मनोज जरांगे यांनी केल्यानंतर मराठा समाजातील अनेक कार्यकर्ते उत्साहित झाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतःच्या कार्यकाळात मराठा समाजासाठी अधिसंख्य पदे निर्माण केली.

आजवर ३५५३ अधिसंख्यपदे भरण्यात आली. याबरोबरच अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू झाली. तसेच राजश्री छत्रपती शाहू महाराज शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती योजनाही सुरू करण्यासाठी त्यांनी महत्त्वाचे निर्णय घेतले.

सारथी राष्ट्रीय अधि छात्रवृति योजना सुरू करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा मोठा हातभार आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मनोज जरांगे यांच्या आंदोलनावर बोलू नका, असे स्पष्ट आदेश शिवसेनेच्या मंत्र्यांना दिले आहेत. मनोज जरांगे यांना मुंबईत येण्यापासून रोखण्याचे प्रयत्न केले जात असताना एकनाथ शिंदे यांच्या या भूमिकेमुळे मराठा समाजात चलबिचल अवस्था आहे. सध्या गणेशोत्सवची धामधूम सुरू आहे. मुंबईत तर गणेशोत्सवानिमित्त प्रचंड गर्दी आहे. राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, मंत्री नितेश राणे, प्रवीण दरेकर, प्रसाद लाड, परिणय फुके तसेच आ. चित्रा वाघ यांनी देखील जरांगे यांच्या अपशब्दांवर कडाडून टीका केली. या टीकेनंतरही मनोज जरांगे हे आंदोलनावर ठाम आहेत. एकंदरीत गणेशोत्सव काळात मनोज जरांगे यांचे हे आंदोलन निर्विघ्न पार पडेल की नाही, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

**डॉ.अभयकुमार दांडगे**

# मराठ्यांचे कुणबीकरण यशस्वी कसे होणार?

## 'सगे-सोयरे' संकल्पनेत कुणबी आणि ममराठाफयांचेही विवाह गृहीत धरल्यास लाभ कोणाला, यासारखे प्रश्न याविषयी आहेत...

कुणबी असल्याचा दावा करत ओबीसी आरक्षणाची मागणी करणाऱ्या मराठ्यांना शांत करण्यात सध्या तरी सरकारला यश मिळाल्याचे दिसते आहे. परंतु अधिसूचनेच्या मसुद्यामार्फत जात ओळख निर्माण करण्याचा जो नवीन मार्ग आखण्यात आला आहे, त्यामुळे सत्ताधारी मराठ्यांच्या हाती ओबीसी प्रवर्गात घुसखोरी करण्याचे शक्तिशाली साधन प्राप्त झाल्याने ओबीसींमध्ये अस्वस्थता निर्माण झालेली आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ममसुदा अधिसूचनेद्वारे कुणबी जातीच्या ओळखीची नोंद असलेल्या मराठ्यांना इतर मागासवर्गीय (ओबीसी) आरक्षणाची घोषणा करून नवी मुंबईत येऊन धडकलेल्या भव्य मराठा मोर्चाचा समारोप करण्यात आला, परंतु या आश्वासनानेही आंदोलकांना शांत केले नसल्याचे आंदोलकांचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा १० फेब्रुवारीपासून उपोषण सुरु केल्यामुळे दिसते. अधिसूचना मसुद्याच्या अंमलबजावणीसाठी हे उपोषण आहे आणि मराठ्यांच्या आरक्षणाला विरोध केल्यास मंडल आयोगाच्या आहवालाला आव्हान देण्याचा इशारा देण्यात आला आहे.

ओबीसी आरक्षणाची मराठ्यांची मागणी १९९० च्या दशकापासून, शेती-अरिष्ट, जमिनीचे तुकडीकरण, रोजगाराचे प्रश्न आणि नव उदारमतवादी आर्थिक धोरणांचे आक्रमण यामुळे रखमाजिक-आर्थिक विषमतेचे स्वरूप अधिक गंभीर रूप धारण करू लागल्याने, आणि मराठ्यांना त्याची झळ बसू लागल्याने मराठ्यांनी पुन्हा एकदा आपण "मूळ कुणबी' असल्याचा दावा करत ओबीसी दर्जा मिळिवण्याचा प्रयत्न केला, या समस्यांना प्रतिसादन्देत नौकरी आणि शिक्षणात महाराष्ट्र सरकारने मराठ्यांसाठी वेगळे आरक्षण देऊ केले. तथापि सर्वोच्च न्यायालयाने २०२१ मध्ये मागासवर्गीय आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडल्याचे कारण देत मराठ्यांना आरक्षण नाकारले. मग वेगळ्या आरक्षणाची मागणी बाजूला ठेवून थेट ओचसी कोट्यात (१९%) कुणबी असल्याचा दावा करत आरक्षणाची मागणी मराठ्यांनी केली, गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये जरांगे-पाटील यांनी पहिल्यांदा, निजाम काळात कुणबी नोंदी असलेल्या मराठ्यांना ओबीसी आरक्षण मिळावे यासाठी उपोषण सुरू केले. नंतर, या मागणीचे स्वरूप व्यदलले आणि संपूर्ण महाराष्ट्रात इंग्रजांच्या काळात कुणबी नोंदी असलेल्या मराठ्यांना आरक्षण मिळावे अशी मागणी होऊ लागली, अखेरीस, संपूर्ण राज्यभरातील मसरसकटफ मराठ्यांना ओबीसी आरक्षण मिळावे अशी मागणी रेटून करण्यात आली. म्हणूनच इथे प्रथमतः मराठा कुणबी जातीच्या समूहाच्या इतिहासाचा संक्षिप्त आढावा घेणे आवश्यक आहे.

मराठा-कुणबी जात समूह मराठा साम्राज्यातून पुढे आलेल्या मराठा या प्रादेशिक ओळखीचे रूपांतर ब्रिटिश काळात एका जातीत झाले. सुरवातीला जेव्य ब्रिटिशांनी त्यांचे रेस (वंश) किंवा ट्राईब असे वर्गीकरण केले तेव्हा त्यांनी मराठ्यांमध्ये दोन वर्ग पहिले शहाण्णच कुळी मराठ्यांचा अभिजन राजेशाही वर्ग आणि आणि पशुपालक आणि शेतकरी कुणची जातींनी बनलेला सामान्य वर्ग, समाजशास्त्रीयदृष्ट्या कुणबी ही एकाच वेळी व्यावसायिक, वर्गीय, आणि जातीच ओळख आहे. शेती हा व्यवसाय अनेक जाती करत असल्यामुळे कुणबी जातीत इतर खालच्या जातींनी समाविष्ट होणे शक्य होत आलेले आहे. हेच विधान मराठा जातीसाठीही लागू होते. मराठा जातीत प्रवेश करून कुणबी जातीतील अनेकांना त्यांचे त्या त्या ठिकाणच्या स्थानिक जातीच्या उतरंडीतील स्थान वर नेता आले. या उतरंडीत वरचे स्थान पटकावण्याची चढाओढ विसाव्या शतकाच्या पूर्वाधात शिगेला पोहोचली. त्याचे एक महत्त्वाचे कारण ब्रिटिशांनी सुरू केलेली जातीय जनगणना है होते. दुसरे महत्त्वाचे कारण महाराष्ट्रात गाजलेला 'वेदोक्त पुराणोक्त' वाद हे होते. कोल्हापूरच्या शाहू महाराजांनी शिवाजी महाराजांचे वंशज म्हणून क्षत्रिय असल्याचा दावा करून वेदोक्त मंत्रोच्चारणाची मागणी केली होती, ती नाकारून मशुद्रांसाठी पुराणोक्त मंत्रचफ हा आग्रह त्या वेळच्या ब्राह्मणांनी कायम ठेवला.

तेव्हापासून मराठा ही 'जातीय' ओळख माणून घट्ट होत गेली आणि त्यात सुरुवातीला शेतीवर उदारनिर्वाह करणा-यांचा आणि स्वतःची ब्राह्मणेतर म्हणून ओळख असलेल्यांचा एक मोठा गट सामील झाला. परंतु, हळूहळू क्षत्रिय ओळख मिळवण्याची अभिलाषा इतकी तीव्र होत गेली की ब्राहमणेतर ओळख व जात्यंताचे समाजकारण व राजकारण मागे पडले, विसाव्या शतकाच्या सुरुवातीला मराठ्यांमधील उन्वधू वगनि कुणबी म्हणून ओळख सांगणाऱ्यांना त्यांनी कुणची ओळख न सांगता मराठा ओळख सांगाची म्हणून भरपूर प्रयत्न केले, जसे प्रयत्न आज मराठा नेते त्यांच्या जात बांधवांनी मराठा ऐवजी कुणची ओळख सांगावी माणून करत आहेत. पण आजही शाहाण्णव कुळी मराठधांची कुटुंबे मोजकीच आहेत. मराठा जाती अंतर्गत असलेल्या उत्तरंडीच्या तळाशी असलेला जो मोठा गट आहे त्यांची सामाजिक आर्थिक परिस्थिती मात्र तीळा मासाच आहे, पण लांचे जे जाती अंतर्गत नाते आणि सामाजिक संबंध आहेत त्यातून त्यांना मराठा जातीकडे असलेल्या सामाजिक व राजकीय सत्तेचा बोडासा का होईना फायदा होतो. त्यामुळेच जातीच्या अंतर्गत उतरंड असूनही महाराष्ट्रात मराठे हे अजूनही एक मजबूत आणि मोठी राजकीय शक्ती आहेत. शिवाजी महाराजांपासून सुरुवात झालेल्या मराठ्यांच्या इतिहासातून त्यांना क्षत्रिय ओळख मिळाली आहे. शेतकरी ही ओळखही यात महत्त्वाची होती. पण फुल्यांकडून आलेला ब्राह्मणेतरांचा वारसा मात्र आता उरलेला नाही.

जरांगे-पाटलांच्या मागणीखातर सप्टेंबर महिन्यात शिंदे सरकारने न्या. शिंदे समिती स्थापन केली. संपूर्ण महाराष्ट्रात कुठे कुठे मराठ्यांच्या कुणबी म्हणून नोंदी आहेत याचा शोध घेण्याचे काम या समितीकडे आहे. महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाकडे ज्यांच्याकडे कुणबी असल्याची ओळख नाही त्यांच्या मागासलेपणाची शहानिशा करण्याचे काम शिंदे सरकारने दिले आहे. परंतु नवी मुंबईपर्यंत आलेल्या मराठ्यांच्या अवाढव्य मोर्चाने सरकारला अधिसूचना काढण्यास भाग पाडले, ते समिती आणि आयोगाने त्यांचे काम संपवण्यापूर्वीच सगे-सोयरे एक विवादास्पद संकल्पना अधिसूचनेच्या मसुद्याने 'सगे सोयरे' ही एक नवीन संकल्पना पुढे आणली आहे. या मसुद्यानुसार कुणब्यांचे सगे सोयरे कुणबी जातीच्या प्रमाणपत्रासाठी पात्र आहेत.

सगे-सोयरे माणजे रक्ताचे आणि लग्न संबंधातून तयार झालेले नातेवाईक, भारतात जातीची प्रमाणपत्रे ठराविक नातेवाईकांच्या जातीच्या पुराव्यांआधारेच दिली जातात. जाती आधारित राखीव जागा, सवलती आणि योजनांसाठी पितृवंशीय रक्ताचे नातेवाईकच (सगे) ग्राह्य धरले जातात, लग्न संबंधांतून जोडले गेलेले नातेवाईक म्हणजे 'सोयरे' ग्राह्य धरले जात नाहीत.

महाराष्ट्र अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम, २०१२ नुसार नातेवाईक म्हणजे 'वंशावळीनुसार अर्जदाराच्या वडिलांच्या बाजूचे रक्ताचे नातेवाईक' कायद्यानुसार एखाद्या व्यक्तीची जात तिच्या किंवा त्याच्या वडिलांकडून येते आणि त्यामुळे जातीचे पुरावे फक्त वडिलांच्या रक्ताच्या नातेवाईकांचेच ग्राह्य धरले जातात.

लग्न संबंध असल्याच्या आधारावर जातीचा दाखला देणे ही नवीनच संकल्पना आहे. हे माणजे बायको आणि तिच्या नातेवाईकांच्या जातीच्या पुराव्यांच्या आधाराने नवरा आणि त्याच्या नातेवाईकांना जातीचे प्रमाणपत्र देणे, भारतात जातीचे प्रमाणपत्र पितृवंशीय नात्याच्या आधारेच दिले जाते.

ते लग्नातून निर्माण झालेल्या नात्यांच्या आधारे दिले जात नाही. जातीच्या आधारावर उच्च वर्गीय जातीना मिळणारे विशेष अधिकार आणि कनिष्ठ वर्षीया जातींचे होणारे शोषण हे पितु वंशीय रक्ताच्या नात्यांच्या आधारच होते. अपत्याला त्याच्या/तिच्या आईची जात का मिळू नये हा अत्यंत रास्त प्रश्ना आहे. आणि सगे-सोयऱ्यांची संकल्पना आईची जातही ग्राह्य धरण्याचा एक मार्ग दाखवत आहे असे वरवर पाहता वाटू शकते. पण सगे सोयरे वा संकल्पनेची व्याप्ती एवढ्यापुरतीच मर्यादित नाही. या संकल्पनेच्या आधारे जातीचा पुरावा विवाहसंबंधातून तयार झालेल्या इतर नातेवाईकांकडूनही मिळू शकतो. मराठा समाजातीला विचारवंत व कार्यकत्यांना या नवीन अधिसूचनेत त्यांच्या आरक्षणाच्या मागणीचा झालेला विजय दिसत आहे, पण ओबीसींना मात्र यात मराठ्यांमधील राजकीय व आर्थिक दृष्टीने शक्तिशाली गटाला मोकळे रान मिळणार आहे असे वाटते.

**काही अनुत्तरित प्रश्न**

अधिसूचनेचा मसुदा हा विवाह जातीत झालेला असावा आणि आंतरजातीय नसावा अशी अट घालतो पण तरीही अनेक प्रश्न अनुत्तरितच राहतात.. मराठा कुणबी विवाह हा जातीत झालेला विवाह मानला जाणार का? मराठा आरक्षणाचे समर्थक असे माणू शकतात की हा जातीत झालेला आहे असेच समजले जावे, विशेषतः मराठा-कुणबी जातींचा इतिहास पाहता, पण तरीही पुरावे नसताना हे कसे सिद्ध करावे? की विवाह कुणबी आणि मराठ्यांमध्ये द्वाला म्हणजे तो जातीत झालेला आहे असे आपसूक गृहीत धरावे? गृहभेटीतून विवाह जातीत आहे याची शहानिशा कशी होईल? त्यामुळेच या अधिसूचनेला येत्या न्यायालयांतही विरोध होऊ शकतो. ओबीसी नेते / संघटनांनी वा मसुद्याचा निःसंदिग्धपणे निषेध केला यात आश्चर्य नाही. तसेच सरकारचा ५७ लाख कुणबी नोंदी क ३० लाख कुणबी प्रमाणपत्रांच्या वितरणाचाबतचा दावा चुकीचा असल्याचे दिसून येत आहे. सरकारने कुणबी नोंदीचे फुगवलेले आकडे आणि मराठ्यांच्या मागासलेपणाचे मोजमाप करण्यासाठी नव्याने सुरू केलेली माहिती गोळा करणे ही मराठ्यांना खूशा करणारी सरकारची जुनीच पण नवीन तंत्रा अवलंबिलेली चाल आहे. या समस्येचं समाधान जात जनगणनेमध्ये असताना, सध्याच्या सरकारला गामी कोणतेच स्वारस्य दिसत नसल्याने मराठा आरक्षणाचे घोंगडे पुढचे अनेक (निवडणुकीचे) महिने भिजतच राहील यात तिळमात्र शंका नाही.

**सई ठाकूर, यशवंत झगडे**
thakur.sai@gmail.com

# जात पाळणे ही अंधश्रध्दा-नागेश चौधरी



**नागपूर:-** सर्व जाती व धर्माचे लोक समान आहेत, त्यामुळे जात पाळणे ही महाभंयकर अंधश्रध्दा आहे असे मत बहुजन विचारवंत व पाक्षिक बहुजन संघर्शचे संपादक नागेश चौधरी यांनी व्यक्त केले. ते "सर्व जाती समान आहेत. कोणतीही जात उच्च वा नीच नाही" या विषयावरील आयोजित चर्चासत्रात ते चर्चासत्राचे अध्यक्ष म्हणून बोलत होते.

या चर्चासत्राचे आयोजन ३१ ऑगस्ट रविवारला दुपारी ३.३० वाजता उमरेड रोड वरील सक्करदरा परिसरातील सेवादल शिक्षण संस्था येथील सभागृहात करण्यात आले होते. या चर्चासत्रात महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समितीचे राज्य उपाध्यक्ष व सेवादल शिक्षण संस्थेचे अध्यक्ष इंजि.संजय शेंडे, महिला सक्षमीकरण कार्यकर्त्या प्रा.माधुरी दुपटे/गायधनी, शाहू आंबेडकरवादी विचारवंत प्रदिप शेंडे व वर्धा येथील बहुजन चिंतक सुरेश बोरकर वक्त्यांनी या विषयावर आपले मत व्यक्त करीत भ्रामक असलेली जातीची संकल्पना लोकांनी आपल्या मानसिकतेतून घालवून सर्व जाती व धर्माचे लोक जीवनदृष्ट्या समान आहेत. कुणीही उच्चनीच वा शत्रू नाहीत यावर मांडणी करीत मानतेची बाजू उचलून धरली.

या कार्यक्रमाचे आयोजन महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समिती, दत्तात्रयनगर शाखा, बहुजन संघर्श समिती व नवउन्मेषण साहित्य सभा यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात होते.

कार्यक्रमाचे संचालन मुख्य आयेजक विनोद उलीपवार यांनी केले तर सुधाताई बामनपल्लीवार यांनी भूमिका मांडली. आभार संजय भलमे यांनी मानले.कार्यक्रमात विजय बाभुळकर, कृश्रा सरोदे,,रंजना कोल्हे, पांडुरंग काकडे, दिवाकर शंभरकर (वर्धा), बाबा बीडकर, अनुज हुलके, दिवाकर शिर्के, अपेक्षा अमीन दिवान, शुभांगी घाटोळे, मालती वराडे, एड.समीक्षा गणेशे, वंदना वानकर, सुरेंद्र बुराडे, प्रा. प्रभाकर पावडे, हरीश देशमुख, अनिता काळे, मिलिंद खैरकर, नामदेव खाटीकर, इंद्रपाल जौंजाळकर, नरेश सहारे, रजत जुनघरे, मृणाल दुपटे, अमर्त दुपटे, शेषराव रामटेके, संजय बेले, प्रकाश वाडीभस्मे, मीरा मदनकर, सुरेश पानतावणे, माधुरी वसंत शोभा,अभिशेक सारनाथ, डॉ.निखिल भुते यांचेसह बरेच समतावादी कार्यकर्ते उपस्थित होते.

# ओबीसी विद्यार्थ्यांनो वसतिगृह प्रवेश व आधार योजनेला मुदतवाढ, १८ सप्टेंबरपर्यंत करा अर्ज




**गोंदिया:-** इतर मागास प्रवर्ग (ओबीसी),विमुक्त जाती,भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षण घेताना वसतिगृह, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार व पंडित दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजनेंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२५ -२६ पासून प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.गोंदिया जिल्ह्यात मुला-मुलींसाठी १०० विद्यार्थी क्षमतेचे शासकीय वसतिगृह सुरू करण्यात आले असून,या योजनेचा लाभ घेण्यासाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज करता येणार आहेत.याकरीता १८ ऑगस्ट ही शेवटची तारीख होती,मात्र ओबीसी संघटनानी शासनाकडे आग्रह धरल्याने आता १८ सप्टेंबरपर्यंत वसतिगृह व आधार योजनेकरीता अर्ज करण्यास मुदतवाढ देण्यात आल्याचे इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या संचालक सोनाली मुळे यांनी पत्रकाद्वारे कळिवले आहे.

संबंधित विद्यार्थी httpp:// hmas.mahait.org या अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज करू शकतील.अर्जाची प्रक्रिया खालील वेळापत्रकानुसार असेल: **अर्ज करण्याचा कालावधी: १ सप्टेंबर २०२५ ते १८ सप्टेंबर २०२५ अर्ज** छाननी कालावधी:१९ ते २४ सप्टेंबर,पहिली निवड यादी २५ सप्टेंबर २०२५ रोजी जाहीर व पहिल्या यादीनुसार प्रवेश अंतिम मुदत १० ऑक्टोंबर २०२५,रिक्त जागांसाठी दुसरी प्रतीक्षा यादी प्रवेश अंतिम मुदत : १७ ऑक्टोंबर २०२५ असा आहे.

या योजनेत बीए,बीकॉम,बीएससी पदवी अभ्यासक्रम तसेच एमए, एमएससी सारख्या पदव्युत्तर अभ्यासक्रमांना प्रवेश दिला जाणार आहे.जास्तीत जास्त पात्र विद्यार्थ्यांनी या योजनेचा लाभ घेऊन उच्च शिक्षणासाठी सुविधा मिळवावी,असे आवाहन विजय वाकुडकर,उपसंचालक,प्रादेशिक विभाग इतर मागास बहुजन कल्याण कार्यालय, नागपूर यांनी केले आहे.

# गोंदिया जिल्ह्यात 'स्क्रब टायफस'चे १३ रुग्ण

**नागपूर :** स्क्रब टायफसने २०१८ मध्ये खळबळ उडून दिली होती. १५५ रुग्ण व २९ मृत्यूची नोंद झाली होती. पूर्व विदर्भात 'स्क्रब टायफस' या जीवघेण्या आजाराने पुन्हा डोके वर काढले आहे. गोंदिया जिल्ह्यात या आजाराचे सात रुग्ण आढळल्याने आरोग्य यंत्रणा सतर्क झाली आहे. पावसाळ्यात या आजाराचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता असल्याने योग्य ती काळजी घेण्याचे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे.

गोंदिया जिल्ह्यातील सडक अर्जुनी येथे स्क्रब टायफस संशयित १३ रुग्णांची नोंद झाली.सात रुग्ण पॉझिटिव्ह आले. यात ९ व १६ वर्षाच्या मुलीसह ३५ वर्षीय तरुणी व ५५ वर्षीय महिला आहेत.

हा आजार 'चिगर माइट्स' नावाच्या सूक्ष्म किटकांमुळे होतो, जे सहसा उंदरांच्या शरीरावर आढळतात. पावसाळ्यात उंदरांच्या बिळात पाणी शिरल्यावर हे माइट्स बाहेर पडतात आणि गवत, शेतजमिनी किंवा झुडपांमध्ये पसरतात. मानवी त्वचेच्या संपर्कात आल्यावर, 'ओरिएन्शिया सुसुगामुशी' नावाचे जिवाणू शरीरात प्रवेश करतात आणि संसर्ग करतात. जिथून प्रवेश करतात ती जागा दुखत नसल्याने त्याकडे दुर्लक्ष होते. चावलेल्या ठिकाणी व्रण येतो. ज्याला 'Bea' म्हणतात. हा 'Bea' या आजाराची ओळख आहे, परंतु सर्वांमध्ये 'Bea' दिसूनच येईल, असे नाही.

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ९४२३११२४३१ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

# नागझिरा कोअरझोन मधील पर्टयन संकुल बाहेर हलवा



**गोंदिया:-** नवेगावबांध-नागझिरा व्याघ्रप्रकल्पाच्या कोअर झोनमध्ये असलेल्या एफडीसीएमच्या मधुकुंज, लताकुंज, हॉलिडे होम, इ. पर्यटका निवासस्थानामुळे तलावपरिसरातील वन्यप्राण्यांसह इतर प्राण्यांना त्रास होत असल्याने मानवी हस्तक्षेप वाढल्यामुळे तेथील वन्यप्राणी गावाकडे येऊ लागले आहेत.त्याकरीता व्याघ्रप्रकल्पाच्या कोअर क्षेत्रात येत असलेले सर्व पर्यटक निवासस्थळ तत्काळ बंद बाहेर हलविण्याची मागणी एनएनटीआरच्या क्षेत्र संचालक श्रीमती पियुषा जगताप यांना निवदेनातून करण्यात आली आहे.हे निवेदन अशोक लंजे,विजय अग्रवाल,श्री.दहिकर,श्री.शर्मा आदींनी दिले.

निवेदनात कोअर झोनमध्ये असलेल्या पर्यटकांसाठी २५ निवासी खोल्या सुरू ठेवलेले आहे. यामध्ये जवळपास ७० ते ७५ पर्यटक जंगलामध्ये वावरतात. त्यामुळे वन्यप्राण्यांना त्यांच्या अधिवासामुळे त्रास होतो. त्यामुळे वन्यप्राणी गावाकडे वळत असून पर्यटकांना वन्यप्राण्यांचे दर्शन होत नाही. जेव्हा की लताकुंज, मधुकुंज आदी कॉटेज हे पीसीसीएफच्या पत्रानुसार मार्च २०२२ पर्यंत बंद होणार होते.मात्र त्याकडे सातत्याने दुर्लक्ष करण्यात आले असून नागझिरा कोअर झोन मध्ये असलेल्या निसर्ग पर्यटन संकुल ०१ एप्रिल २०२३ पासून २३/१०/२०२६ पर्यंत आरक्षण सुरू करून नागझिरा निसर्ग पर्यटन संकुल सुरू ठेवण्याची परवानगी दिली आहे.

नवीन नियमांनुसार, ते गाभा क्षेत्रात अस्तित्वात राहू शकत नाही. तलावालगतच्या कंपार्टमेंट क्रमांक ९७ मध्ये ४३ एकरमध्ये पसरलेले विश्रामगृहे, पर्यटक बंगले, कॅन्टीन इत्यादी आहेत.हे बंद करुन बाहेर केल्यास वन्यप्राण्यांना मुक्तसंचार करण्यास मदत होणार आहे.

# वनिताताई ठाकरे यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश

तिरोडा,- खा प्रफुल पटेल यांचे जनसंपर्क कार्यालय, पाल चौक गोंदिया येथे तिरोडा येथील काँग्रेस नेत्या वनिताताई ठाकरे यांनी माजी आमदार राजेंद्र जैन यांच्या प्रमुख उपस्थितीत पक्षाचा दुपट्टा वापरून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. राजेंद्र जैन यांनी पक्षात स्वागत करून पुढील वाटचालीच्या त्यांनी शुभेच्छा दिल्या.खासदार प्रफुल पटेल यांच्या विकासात्मक धोरणांवर व सक्षम नेतृत्वावर विश्वास ठेवून पक्षात प्रवेश केला. पक्ष प्रवेशामुळे या तालुक्यात महिलांचे संघटन शक्ती वाढेल व पक्ष मजबूत होणार आहे. या प्रसंगी सर्वश्री राजेंद्र जैन, तालुका अध्यक्ष जगदीश बावनथडे, खुमेंद्र रहांगडाले, राजकुमार ठाकरे, कल्पनाताई दहीकर, मधुकर दहीकर, देवेंद्र चौधरी, मुन्नालाल बिंझाडे सहित पक्ष पदाधिकारी व कार्यकर्ता उपस्थित होते.

# ग्राहक सोसायटीची आमसभा वादळी, सभासदांमध्ये संताप

## विभागीय सहआयुक्तांना करणार तक्रार

**भंडारा जिल्हा परिषद व शासकीय कर्मचारी सहकारी पतसंस्थेत भोंगळ कारभार सुरू असून एककल्लीपणा होत आहे. सभासदांना विश्वासात न घेता निधीची लूट केली जात आहे. या विरोधात विभागीय सहआयुक्त नागपूर यांच्याकडे तक्रार करणार असल्याची माहिती सभासदांनी दिली.**

**भंडारा:-** जिल्हा परिषद व शासकीय कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या नवीन दोन शाखा उघडण्याची कोणतीही गरज नसताना गोंदिया जिल्ह्यातील आमगाव आणि भंडारा जिल्ह्यातील पवनी याठिकाणी संस्थेची शाखा उघडून कर्मचारी भरतीचा घाट घातला जात आहे. हा मुद्दा ३१ ऑगस्ट रोजी पवनी येथे झालेल्या संस्थेच्या आमसभेत प्रचंड गाजला. याविरोधात सभासदांनी गदारोळ केल्यावरही त्या गदारोळातच नव्या शाखा सुरू करण्याचा ठराव संमत करण्यात आला. या प्रकारामुळे सभासदांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

भंडारा जिल्हा परिषद व शासकीय कर्मचारी सहकारी पतसंस्थेचे कार्यक्षेत्र भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यात विस्तारले आहे. २०२३ मध्ये झालेल्या संस्थेच्या निवडणुकीत, नवीन कमचाऱ्यांची भरती करु नये तसेच नवीन शाखा उघडण्यात येऊनये, असे आश्वासन देऊन प्राथमिक शिक्षक संघ प्रणित आघाडी सत्तेत आली. मात्र संस्थेच्या विद्यमान सत्ताधाऱ्यांनी हे आश्वासन बासनात गुंडाळून नवीन शाखा उघडून त्यातून नवीन पदभरती करण्याचे ठरविले. याला प्रचंड विरोध करण्यात आला होता.

३१ ऑगस्ट रोजी संस्थेची सर्वसाधारण सभा पवनी येथे आयोजित करण्यात आली होती. या सभेत आमगाव आणि पवनी येथे शाखा उघडण्यास सभासदांनी विरोध दर्शविला. आकृतीबंध वाढवून पदे भरण्याचा हा डाव असल्याचे सभासदांकडून ठासून सांगण्यात आले. परंतु, या विरोधाला न जुमानता गदारोळात ठराव मंजूर करण्यात आला. विशेष म्हणजे, या मुद्दयावर विरोध करण्यासाठी दोन तास सभागृहात सभासदांनी गदारोळ केला होता. जमाखर्चात, अभ्यासदौऱ्यासाठी ७ लाख रुपयांचा अतिरिक्त खर्च दाखविण्यात आला. हा अतिरिक्त खर्च सभासदांना मान्य नव्हता. याशिवाय, किरकोळ खर्च व ऑडिट फी हा खर्चही वाढीव दाखविण्यात आल्याचा आरोप सभासदांनी केला. सभासदांच्या मागणीनुसार, कर्ज व्याज अर्धा टक्के कमी करण्याऐवजी सत्ताधाऱ्यांनी मनमर्जीने त्याला केराची टोपली दाखविल्याचा आरोप सभासदांनी केला आहे. विविध मुद्यांवरून ही सभा वादळी ठरल्याने या संस्थेच्या कामकाजावर सभासदांनी आश्चर्य व्यक्त केले आहे

# २३५ आश्रमशाळांना 'वॉशिंग मशीन' मिळणार,मुलांचा वेळ अनब श्रमही वाचणार!



**गोंदिया :-** इतर मागास बहुजन कल्याण विभागातर्फे राज्यातील २३५ खासगी अनुदानित आश्रमशाळांना कपडे धुण्याचे यंत्र (वॉशिंग मशीन) देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यासाठी विभागाकडून १३ कोटी ९९ लाख रुपये उच्च खर्च करण्यात येणार आहेत. इतर मागास बहुजन कल्याण विभागाने याबाबतचा शासन निर्णय प्रसिद्ध केला.

सद्यःस्थितीत विभागांतर्गत ९८० प्राथमिक, माध्यमिक आणि माध्यमिक आश्रमशाळा आहेत. या मवॉशिंग मशीनफ गोंदिया जिल्ह्यातील आश्रमशाळांनाही मिळणार आहेत.

विमुक्त जाती भटक्या जमाती प्रवर्गातील मुला-मुलींना पहिली ते बारावीपर्यंत मोफत शिक्षणासह मोफत निवास, भोजन व्यवस्था, आरोग्य सुविधा, क्रीडा सुविधा, शैक्षणिक साहित्य, अंथरूण-पांघरूण, भोजनाची भांडी आदी सुविधा पुरवण्यात येतात. त्यासाठी संस्थांना वेतनेतर अनुदान देण्यात येते. आश्रमशाळांत प्रवेशित विद्यार्थी हे प्रामुख्याने निवासी आहेत.

### मुख्याध्यापकांवर जबाबदारी

**आश्रमशाळांना अत्याधुनिक वॉशिंग मशीन देण्यात आली आहे. आता उर्वरित २३५ आश्रमशाळांना वॉशिंग मशीन देण्यात येणार आहेत. या मशीनची देखभाल आणि दुरुस्ती करण्याची जबाबदारी संबंधित मुख्याध्यापक व वसतिगृह अधीक्षक यांच्यावर राहणार आहे. मागास बहुजन कल्याण विभागाकडून १३ कोटी २९ लाख रूपये खर्च केल जाणार आहे**

### अंगावर स्वच्छ कपडा चढणार

**आश्रमशाळांतील विद्यार्थी स्वतःचे कपडे स्वतः धूत असतात. त्यामुळे त्यांच्या हातून कपडे पाहिजे तेवढे स्वच्छ होत नाही. कापडात सूक्ष्म जंतू तयार होऊन विद्यार्थ्यांना त्वचेचे आजार होऊ शकतात. स्वच्छ कपडे त्यांच्या अंगावर असावेत, यासाठी वॉशिंग मशीन दिली जाणार आहे.**

### वॉशिम मशीनसाठी १४ कोटी शासन खर्च करणार

**आश्रमशाळांना कपडे धुण्यासाठी १४ कोटी रुपये खर्च करून वॉशिंग मशीन देण्यात येणार आहे. विभागात ९८० प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक आश्रमशाळा कार्यरत आहेत. पहिल्या टप्प्यात ५८५ आश्रमशाळांपैकी ३५० आश्रमशाळांना वॉशिंग मशीनचे वितरण केले जाणार आहे.**

### मुलांच्या विकासाला चालना मिळणार

**आश्रमशाळांतील मुलांचा बराच वेळ कापड धुण्यात जात होता. कपडे धुणे जिकरीचे होते, त्यात त्यांचा बराच वेळ जातो. या वेळेची बचत करण्यासाठी शासनाने वॉशिंग मशीन देण्याचे ठरविल्याने आता आश्रमशाळेच्या विद्यार्थ्यांचा वेळ वाचेल आणि त्यांच्या विकासाला चालना मिळेल.**

### मुलांना अभ्यासाला जास्त वेळ मिळणार

**आश्रमशाळा सुरू असलेल्या कालावधीत विद्यार्थ्यांना स्वतःचे कपडे स्वतः धुण्यात मर्यादा येतात. विद्यार्थ्यांचे वय लक्षात घेता त्यांना कपडे धुणे जिकरीचे होते, त्यात त्यांचा बराच वेळ जातो. परिणामी, अभ्यास आणि मैदानी खेळांसाठी त्यांना पुरेसा वेळ मिळत नाही. आता वॉशिंग मशीन मिळणार असल्याने अभ्यासाला पुरेसा वेळ मिळणार आहे.**

# विद्यार्थ्यांनी दिले रस्ता दुरुस्तीच्या मागणीचे निवेदन



**तिरोडा :-** तिरोडा शहरातील रस्ते चिखलमय झाले आहेत. तर पंचायत समिती व तहसील कार्यालयाकडे जाणारा रस्ता खड्डे व चिखलमय झाला असल्याने या मार्गावरून ये-जा करणे कठीण झाले आहे. याचा फटका शालेय विद्यार्थ्यांनाही बसत आहे. या समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी विद्यार्थ्यांनी खासदार प्रशांत पडोळे यांना निवेदन देऊन तुम्हीच सांगा आम्ही शाळेत जायचे कसे असा सवाल करीत रस्ता दुरुस्ती करण्याची मागणी केली.

शहरातील पंचायत समिती व तहसील कार्यालयांकडे जाणारा रस्ता हा पूर्णपणे चिखलमय व खड्डेमय झाला आहे. या रस्त्याची दुरुस्ती करण्याची मागणी अनेकदा करण्यात आली. पण त्याची कुणीच दखल घेतली नाही. परिणामी या रस्त्यावरून पायी चालणे, सायकल चालविणे, चारचाकी व दुचाकी वाहने नेणे कठीण झाले आहे. हा कृषी विभागाच्या कार्यालयापासून तर पंचशिल चौक, पंचायत समितीपर्यंत पूर्णपणे खड्डेमय झाला आहे. या खड्ड्यांमध्ये पाणी साचून गटारे तयार झाली असल्याने या मार्गावर अपघातांच्या संख्येत वाढ झाली आहे. याच मार्गावर शाळा व महाविद्यालय असल्याने विद्यार्थ्यांनासुद्धा या रस्त्याचा फटका बसत आहे. या रस्त्याने नेहमी वर्दळ राहत असल्याने विद्यार्थ्यांना जीव आहे. त्यामुळे या रस्त्याची त्वरित दुरुस्ती करण्याची मागणी जीवन मनीष तुरकाने व अपन नवीन गुप्ता व विद्यार्थ्यांनी खासदार डॉ. प्रशांत पडोळे यांना सोमवारी (दि.१) दिलेल्या निवेदनातून केली. यावेळी चुन्नीलाल राऊत, लंकेश जनबंधू, अभय चौरे, कालू कठाणे, सचिन कठाणे, निशांत भास्कर, अंकित मेश्राम, अर्जुन कटरे, सौरभ रामटेके, किरण वालदे, विजय गौतम, योगेश मेश्राम, शिशुपाल तुमसरे, मिलिंद मेश्राम, स्वरूप अंबादे, नितीन कठाणे, अरूण अंबादे उपस्थित होते

# आगामी निवडणुकीसाठी सज्ज व्हा-मनोहर चंद्रिकापुरे



**अर्जुनी मोरगावः-** गाव तिथे शिवसेनेची स्थापना करा. पक्षप्रमुख राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात आपल्या निवडून लढण्यासाठी शिवसैनिकांनी तत्पर असले पाहिजे. त्याकरिता स्वतः सर्व सर्कल पिंजून काढीत पक्ष मजबूत करण्यासाठी सज्ज व्हावे. एक-एक शाखा प्रमुख, प्रभाग प्रमुख आपल्यासाठी महत्त्वाचा आहे. त्यामुळे पक्षातील सर्व मतभेद बाजूला ठेवून आपण पक्ष बांधण्यासाठी काम करावे, असे प्रतिपादन माजी आमदार मनोहर चंद्रिकापुरे यांनी केले.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका अनुषंगाने ३० ऑगस्ट शनिवार रोजी शिवसेना शिंदे गट अर्जुनी मोरगाव शहरातील नगर पंचायत सभागृहात आढावा बैठक झाली. या बैठकीला मार्गदर्शन करताना माजी आमदार तथा शिवसेना नागपुर लोकसभा संपर्कप्रमुख मनोहर चंद्रिकापुरे बोलत होते.

सभेला संजय ईश्वर, यशवंत शहारे, प्रमोद डोंगरे, देवा डोंगरवार, भूषण शेंडे, आशिष लंजे, कुंडलिक लोणारे, मन्साराम डोंगरवार, राजकुमार शहारे, मायाताई, राधेश्याम भैसारे, संदीप लाडे, बुद्धविजय धाकडे, फाल्गुन नखाते, वीरेंद्र ठाकरे, अनिल घरडे, तुषार लोडगे, शुभम नेवारे, सौरभपेटकर, निशाताई मस्के, साविताई भलावी, रीनाताई सांगोळे, पुष्पा जांभुळकर, उज्वलाताई शैलेश खोब्रागडे, आरती मेश्राम, सुगंधाताई शहारे, रंजनाताई शहारे, दुर्गाताई दुर्योधन शहारे, सुजाताई प्रशांत खोब्रागडे, अश्विनी विवेक खोब्रागडे, शीलाताई ज्ञानेश्वर प्रधान, ज्योती रामटेके, भास्कर लांजेवार, आत्माराम वाडगुरे, नरहरी जांभूळकर, अनिकेत भलावी, तसेच शिवसेना पक्षाचे कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.

याप्रसंगी अर्जुनी मोरगाव तालुक्यातील व नगर पंचायत भागातील संपूर्ण माहिती देऊन सर्कलनिहाय जिल्हा परिषद व नगर पंचायत हद्दीतील वॉर्डनिहाय शिवसेना पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या २५ दिवसांत करण्यात येतील, तसेच जि.प., पं. स. सर्कल प्रमुख व अर्जुनी मोरगाव शहरातील पदाधिकारी यांनी निवडणुकीआधी पक्षबांधणी करायची आहे. यासाठी सज्ज राहण्याच्या सुचनाही पदाधिकारी व कार्यकर्त्यांना माजी आमदार मनोहर चंद्रिकापुरे यांनी दिल्यात.

# नियमबाह्य गतिरोधक; उठले जीवावर



**गोंदियाः-** नियमबाह्य तसेच न रंगविलेल्या गतिरोधकांमुळे अनेक वाहनचालकांना अपघातांना सामोरे जावे लागत आहे. याबाबत संबंधित विभागाचे दुर्लक्ष झाल्याचे दिसून येत आहे. मुख्य रस्ते आणि गल्लीबोळांतील मार्गावरील वाहतुकीची सारखीच परिस्थिती आहे.

वाहनांचा वेग मर्यादित असेल, तर वाहनचालकांना या गतिरोधकांमुळे कोणताही त्रासहोत नाही. मात्र, पालिकेकडून शहरातील रस्त्यांवर वाट्टेल तिथे आणि कसेही गतिरोधक बसविले आहेत. पालिका खासगी ठेकेदारांकडून रस्त्यांवरगतिरोधक टाकण्याचे काम करून घेते. मात्र, ते कोणतेही निकष पाळत नसल्याने रस्त्यांवरील गतिरोधक मोठा अडथळा निर्माण करीत आहेत. वाहने सरळ या गतिरोधकावर आदळत आहेत. त्याचबरोबर पालिकेने लावलेल्या रस्त्यांवरील नियमबाह्य गतिरोधकांना दर्शक पट्टे नसल्याने अनेकवेळा हे गतिरोधक दिसूनन आल्याने वाहनांचे अपघात होत आहेत. पालिकेकडून करण्यात आलेले एक टक्काही गतिरोधक नियमात नसल्याचे दिसून येत आहे. परिणामी, नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागल आहे. राज्यमार्गासह शहरातील गल्लीबोळांत गतिरोधकांचे अनावश्यक जाळे पसरले आहे. स्थानिक लोकप्रतिनिधी आणि नागरिकांच्या इच्छेनुसार गतिरोधक बसविले जातात. गतिरोधकांची उंचीही प्रमाणित उंचीपेक्षा अधिक असल्याने

दुचाकीस्वारांचे हाल होत आहेत. अधिकतर वाहने रात्रीच्या वेळेस गतिरोधकांवरून आदळत असल्याचे दिसून येत आहे. यात दुचाकीवर मागे बसलेल्या महिला, नागरिक खाली पडून जखमी होत आहेत. शहरातील गतिरोधकांची पाहणी करून नियमांनुसार गतिरोधक तयार करावेत, अशी मागणी नागरिकांतून होत आहे. त्यामुळे शहरातील हे गतिरोधक काढून नियमानुसार कमी उंचीचे बांधण्यात यावे, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. याकडे नगरपालिकेने लक्ष द्यावे, तसेच संबंधित कंत्राटदार कंपनीला योग्य गतिरोधक बांधण्याचे निर्देश द्यावे, असे शहरातील नागरिकांचे म्हणणे आहे.

### वाहनचालकांना त्रास

**नियमानुसार किती अंतरावर व कोणत्या रस्त्यावर गतिरोधक असावेत याची माहितीच प्रशासनाला नाही. शहरातील राष्ट्रीय महामार्ग, राज्य महामार्ग, बाजारपेठांतील रस्त्यांवर तर गतिरोधक आहेतच, त्याशिवाय शहरातील गल्लीबोळांतील रस्त्यांवरदेखील गतिरोधक तयार करण्यात आलेले आहेत. याचा त्रास वाहनचालकांना सहन करावा लागत आहे.**



## बटाणा येथे तीन घरे आगीत भस्मसात

**गोंदियाः -** तालुक्यातील बटाणा येथे अचानक लागलेल्या आगीत तीन घरे जळून खाक झाले. आगीत तिन्ही घरातील अन्न धान्यासह जीवनावश्यक वस्तू भस्मसात झाली.ही घटना शुक्रवार २९ ऑगस्ट रोजी रात्री ८.३० वाजताच्या सुमारास घडली. या घटनेत सुदैवाने कुठलीही जीवितहाणी झाली नसली तरी तिन्ही घरमालकांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. सचिन रहांगडाले, नुतनलाल रहांगडाले, छत्रपाल रहांगडाले अशी पिडीत घरमालकांची नावे आहे. आग नेमकी कशामुळे लागली हे कळू शकले नाही. घटनेची माहिती स्थानिक तलाठी व तहसील प्रशासनाला देण्यात आली आहे.

# पहिला भटके विमुक्त दिवस उत्साहात




**गोरेगाव :-** वनकामगार भवन गोरेगाव येथे ३१ ऑगस्ट रोजी पहिला भटके विमुक्त दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी जगदीश येरोला होते. दीप प्रज्वलक आशिष बारेवार प्रामुख्याने उपस्थित होते.

कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून अरविंद जयस्वाल, मोरेश्वर कांबळे, मन्सुभाऊ मारबदे, वामन शहारे, हिरालाल रहांगडाले, छन्नु अगडे, गौरीशंकर गाढवे, विजेंद्र केवट, ओमकार मेश्राम, मनोज चाचरे, भादु चाचेरे, विकास चाचेरे, सुनील चाचेरे, कु. सुनीता मांढरे आदी मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचे सत्कार करण्यात आला. दरम्यान मान्यवरांनी अनेक विषयावर समाजजागृती पर मार्गदर्शन केले. तसेच शासनाच्या विविध योजनांची माहिती देण्यात आली. अनेक वक्त्यांनी समाज प्रबोधनपर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी निक्की मोहनकर, नितीन कांबळे, अनिल मेश्राम, अजय मेश्राम, अश्विन मोहनकर, राहुल मोहनकर, नामदेव मेश्राम, प्रकाश मेश्राम, श्रावण मौजे, सुभाष मेश्राम, जितू मेश्राम, रुपेश बागडे, विकी मोहनकर, सतीश मेश्राम, अश्विन मेश्राम, मनीषचाचेरे, शुभम चाचेरे, मंगेश मेश्राम, महेश मेश्राम, परमेश्वर मेश्राम, सुनील बागडे, गुड्डू मेश्राम, सुनील मेश्राम, कैलास चाचेरे, शैलेश चाचेरे, मनोज मेश्राम, चंद्रभान चाचेरे, राकेश मेश्राम, नंदकिशोर चाचेरे, राजेंद्र सहकार्य केले. कार्यक्रमाला स्थानिक समाज बांधव व भगिनी यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदविला. मेश्राम, महेश मेश्राम, उमेश मेश्राम, महेंद्र चाचेरे, रमेश चाचेरे, मनीष मेश्राम, श्लोक मेश्राम, देवानंद मेश्राम, अरविंद चाचरे, करण मेश्राम, अभय मेश्राम, गिरीश चाचरे, अनुप वलथरे, आकाश मेश्राम यांच्यासह ढिवर समाज नवयुवक सहकार्य केले. कार्यक्रमाला स्थानिक समाज बांधव व भगिनी यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदविला.

# एकोडी प्राथ.आरोग्य केंद्रात १२७ नागरिकांची कर्करोग तपासणी



**गोंदियाः-** कर्करोगासारख्या गंभीर आजाराचे वेळेत निदान व्हावे व नागरिकांना मोफत उपचार मिळावेत या उद्देशाने राज्य शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने मोबाईल कर्करोग तपासणी व्हॅन गोंदिया जिल्ह्यात दि.२१ ऑगस्ट पासुन दाखल झाली असुन आरोग्य विभागाने जिल्ह्यातील आठही तालुक्यातील ३३ आरोग्य संस्थेतील गावात मोबाईल कर्करोग तपासणी व्हॅन द्वारे महिला व पुरुषांची मोफत तपासणी करण्यात येणार असल्याची माहीती जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.पुरुषोत्तम पटले यांनी दिली आहे.

या व्हॅनद्वारे शहरासह ग्रामीण व दुर्गम भागातील नागरिकांची मोफत कर्करोग तपासणी केली जात आहे.प्राथमिक आरोग्य केंद्रे व ग्रामीण रुग्णालयांना भेट देऊन एका दिवसात शंभरहून अधिक रुग्णांची तपासणी करण्याची क्षमता या व्हॅनमध्ये असल्याची माहीती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.अभिजित गोल्हार यांनी दिली आहे..

दि.२९ ऑगस्ट रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र एकोडी येथे कर्करोग तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.या शिबिरात १२७ नागरिकांनी मोबाइल कॅंसर व्हॅनमध्ये आपली तपासणी केली असुन त्यात ६८ मुख कर्करोग,२१ महिलांची गर्भाशय कर्करोग,३८ महिलांची स्तन कर्करोग संबधाने तपासणी केल्याची माहीती वैद्यकिय अधिकारी डॉ.वैशाली बिसेन यांनी यावेळी दिली आहे.मोबाईल व्हॅनमध्ये ए.सी.तपासणी कक्ष असून मुख कर्करोगासाठी डेंटल चेअर, स्तन कर्करोगासाठी प्रगत तपासणी यंत्रणा व गर्भाशयाच्या कर्करोगासाठी कोल्पोस्कोप यंत्र आहे.

मोबाइल कॅंसर व्हॅनमध्ये आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरात स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ.पलास गणवीर,मुखरोग तज्ज्ञ डॉ.अनिल आटे व शल्यचिकित्सक डॉ.तुषार डहाके यांचे सह त्यांची चमु द्वारे तपासणी करण्यात आली.तपासणी झालेल्या संशयितांना पुढील उपचारांसाठी मार्गदर्शनही करण्यात आले.

कॅन्सर तपासणी शिबीर तालुका आरोग्य अधिकारी डॉ.निलेश जाधव व वैद्यकीय अधिकारी डॉ.वैशाली बिसेन यांचे मार्गदर्शनात आयोजित करण्यात आले होते.कॅन्सर तपासणी शिबिराला पदाधिकारी जि.प.सदस्य अश्विनीताई पटले तसेच तालुका आरोग्य अधिकारी डॉ.निलेश जाधव, तालुका पर्यवेक्षक महेश चिंधालोरे व बघेले यांनी भेट देवुन दिली पाहणी केली आणि यावेळी अधिकाधिक नागरिकांनी आरोग्य तपासणी करून घेण्याचे आवाहन याप्रसंगी केले.

शिबिराच्या यशस्वीतेसाठी समुदाय आरोग्य अधिकारी डॉ.मंगेश कांबली,डॉ.निलम बघेले व डॉ.सोनल कांबळे आरोग्य सेविका सुषमा सारवे व उमा हट्टेवार,आरोग्य सहाय्यक बडोले,आरोग्य सहायिका कुमुद तुरकर,फार्मासिस्ट कोमल मेश्राम यांचेसह प्राथमिक आरोग्य केंद्रातील व अंतर्गत उपकेंद्रातील सर्व अधिकारी,कर्मचारी व आशा सेविका यांनी विशेष परिश्रम घेतले.

## तिरोडा येथे युवकांसाठी पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन

**गोंदिया :-** जिल्ह्यातील युवक-युवतींना रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र गोंदिया व सी.जे.पटेल महाविद्यालय तिरोडा यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार दि.३ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता सी.जे.पटेल महाविद्यालय, खैरलांजी रोड, तिरोडा येथे पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. सदर रोजगार मेळाव्यामध्ये विविध कंपन्यांचे उद्योजक, नियोक्ता, प्लेसमेंट एजन्सी सहभागी होणार आहेत.

इयत्ता १० वी व १२ वी पास, आयटीआय, तसेच कोणत्याही शाखेचा पदवीधर अशा पात्रता असणाऱ्या बेरोजगार उमेदवारांसाठी रोजगाराची ही सुवर्ण संधी आहे. उमेदवारांनी शैक्षणिक पात्रतेची प्रमाणपत्रे जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, गोंदिया या कार्यालयाचे नोंदणी कार्ड सोबत आणणे आवश्यक आहे.

अधिक माहितीकरीता जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र येथील दूरध्वनी क्रमांक ०७१८२-२९९१५० यावर किंवा सेपवळ्रीक्षसरीऽसारळश्र.लो या ई-मेल आयडीवर संपर्क साधावा. सदर रोजगार मेळाव्यामध्ये जास्तीत जास्त उमेदवारांनी सहभागी व्हावे, असे आवाहन रा.ना.माटे, सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, गोंदिया यांनी केले आहे.

# प्लॅट फॉर्मवर तिकीट काउंटरची व्यवस्था करा



**तिरोडा :-** रेल्वेस्थानकाच्या डाउन लाईन प्लॅट फॉर्मवर तिकीट काउंटर नसल्याने नागरिकांना अडचणी येत आहेत आणि नागरिकांनी तेथे तिकीट काउंटरची व्यवस्था करण्यात यावी, अशी मागणी प्रवाशांच्या शिष्टमंडळाने स्टेशन मास्तरांची नुकतीच भेट घेवून केली. तिरोडा रेल्वेस्थानकाच्या डाउन लाईन प्लॅट फॉर्मवर तिकीट काउंटर उपलब्ध नाही. त्यामुळे डाउन लाईन प्लॅट फॉर्मवरून येणाऱ्या-जाणाऱ्या प्रवाशांना खूप त्रास सहन करावा लागतो. अप लाईनवर दोन तिकीट काउंटर आहेत.

परंतु डाउन लाईनवर तिकीट काउंटर उपलब्ध नाही. अप लाईन प्लॅट फॉमवर पोहोचण्यासाठी प्रवाशांना डाउन लाईनवरून पुलावर चढावे लागते. चढताना अनेक वेळा ट्रेन चुकते. चढताना ज्येष्ठ नागरिकांनाही खूप त्रास सहन करावा लागतो.

कावेलवाडा परिसरातील १० ते १५ गावातील प्रवासी दररोज डाउन लाईन प्लॅट फॉर्मवरून ये-जा करतात आणि त्यांना तिकीट काढण्यासाठी पूल ओलांडावा लागतो. डाउन लाईन प्लॅट फॉर्मवर तिकीट काउंटरची व्यवस्था करावी अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

निवेदन देणाऱ्या शिष्टमंडळात किरण पारधी, पिंटू चौधरी, सरपंच तुरेंद्र नागपुरे, माजी सरपंच भोजलाल नागपुरे, मोरेश्वरजी नागपुरे, सरपंच महेश लिल्हारे, योगेश टेभरे आदी उपस्थित होते.

# जिल्ह्यात केवळ ३७ टक्के शेतकऱ्यांनी केली ई-पीकपाहणी

**गोंदिया :-** शेतकऱ्यांना पीकविमा योजनेसह नुकसानभरपाई व कृषी विभागाच्या योजनांचा लाभ घेण्यासाठी ई-पीकपाहणी करणे अनिवार्य आहे. पण ई-पीकपाहणी करण्यासाठी शेतकऱ्यांना विविध अडचणींना तोंड द्यावे लागत असून, आतापर्यंत जिल्ह्यातील केवळ ३७टक्केच शेतकऱ्यांनी पीकपाहणी केली आहे. पीकपाहणी न केल्यास शेतकऱ्यांना याचा फटका बसण्याची शक्यता आहे.




जिल्ह्यात खरीप हंगामात एकूण २ लाख १६ हजार हेक्टरवर विविध पिकांची लागवड करण्यात आली आहे. यात सर्वाधिक १ लाख ९६ हजार हेक्टरवर धानाची लागवड करण्यात आली आहे, तर उर्वरित क्षेत्रावर इतर पिकांची लागवड करण्यात आली आहे. शासकीय योजनांमधील अनियमितता दूर करण्यासाठी गेल्या दोन वर्षापासून शासनाने ई-पीकपाहणी करणे अनिवार्य विभागाच्या योजनांचा लाभ, नैसर्गिक आपत्तीमुळे पिकांचे नुकसान झाल्यास त्याची नुकसानभरपाई मिळण्याकरिता ई-पीक नोंदणी अनिवार्य करण्यात आली आहे.

पीकविमा योजनेचा लाभ, शासकीय धान खरेदी केंद्रावर धानाची विक्री, कृषी करण्यासाठी गेल्या दोन वर्षापासून शासनाने ई-पीकपाहणी करणे अनिवार्य विभागाच्या योजनांचा लाभ, नैसर्गिक आपत्तीमुळे पिकांचे नुकसान झाल्यास त्याची नुकसानभरपाई मिळण्याकरिता ई-पीक नोंदणी अनिवार्य करण्यात आली आहे.

पीएम किसान योजना, बोनससाठीसुद्धा ई-पीक नोंदणी आवश्यक आहे. जिल्ह्यात २ लाख ७२ हजारावर शेतकरी आहे. यापैकी आतापर्यंत केवळ ३७ टक्केच शेतकऱ्यांनी ई-पीकपाहणी केली आहे. तर अद्यापही मोठ्या प्रमाणात शेतकरी ई-पीकपाहणीपासून वंचित आहे. ई-पीक नोंदणी करताना शेतकऱ्यांना विविध अडचणींचा सामना करावा लागत आहे, तर ग्रामीण भागात नेटवर्कची समस्या कायम असल्याने ई-पीकपाहणी करायची कशी, असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर निर्माण झाला आहे. ई-पीक नोंदणी न झाल्यास शेतकऱ्यांना याचा आर्थिक फटका बसण्याची शक्यता असल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.

### ई-पीक नोंदणीचे सर्व्हर डाउन

**शेतकरी ई-पीक नोंदणीसाठी नोंदणी करताना अडचण होत आहे. दिवसभर सर्व्हर डाउन राहत असून, रात्री ते सुरू असते त्यामुळे रात्री शेतात जाऊन फोटो काढायचे कसा प्रश्न शेतकऱ्यांसमोर निर्माण झाला आहे.**



## ग्राम पंचायत कार्यालय मुंडीपार/ई.

**पंचायत समिती सडक/अर्जुनी जि.गोंदिया**

**-: टेंडर नोटीस :-**

जा.क्र.ग्रा.पं.मुंडीपार/ई.नी.१६४/२०२५-२६ दि.०३/०९/२०२५ ग्रा.पं.मुंडीपार/ई.त.स./अर्जुनी जि.गोंदिया च्या वतीने खालील नमुद केलेल्या कामाकरिता ऑनलाईन जाहिरात पद्धतीने महाराष्ट्र शासन/जि.प.गोंदिया/सार्वजनिक बांधकाम विभागाच्या योग्य त्या वर्गातील पंजीबद्ध कंत्राटदाराकडून दोन लिफाफा पद्धतीने निविदा मागविण्यात येत आहे. या निविदेबाबत संपुर्ण माहिती ग्रामपंचायत मुंडीपार/ई. येथे दि.०४/०९/२०२५ रोजी ११.०० वाजेपासून दिनांक ०६/०९/२०२५ ला दुपारी ३.०० वाजेपर्यंत पाहता येईल व निविदा मिळतील यांनी भेटता येईल.

| कामाचे नाव | कामाची किंमत | निविदा फी | अनामत रक्कम | निधी प्रमुख | कामाचे कालावधी | कंत्राटदाराचे वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १. जि.प.शाळा रंगरंगोटी करणे व इतर कामे | १,००,०००/- | ५००/- | १,०००/- | १५ वा वित्त आयोग | ९० दिवस | १ ते ७ |
| २.बंदिस्त नाली बांधकाम | १,९०,०००/- | ५००/- | १९००/- | १५ वा वित्त आयोग | ९० दिवस | १ ते ७ |

**निविदा बाबद आवश्यक बाबी:-**१. निविदा विक्री व स्विकृती दि.०४/०९/२०२५ रोजी दुपारी ११.०० वाजेपासून दिनांक ०६/०९/२०२५ ला दुपारी ३.०० वाजता पर्यंत २.निविदा उघडणे दि.०८/०९/२०२५ दुपारी ३.०० वाजता (शक्य झाल्यास). ३. निविदा फी हि निविदा खरेदी करतांना नमुना ७ च्या पावती द्वारे भरण्यात यावी. ४. सुरक्षा अनामत रक्कम हि निविदा उघडल्यानंतर ५ दिवसाच्या आत नमुना ७ च्या पावती द्वारे ग्रा.पं.कार्यालय मुंडीपार/ई. येथे जमा करुन पावती क्र.नोंदनी करुन पावतीची प्रत कार्यालयात जमा करावी. ५. कोणतीही निविदा अंशतः अथवा पुर्णता स्वीकारण्याचे अथवा नाकारण्याचे अधिकार सरपंच व ग्रामसेवक ग्रा.पं.मुंडीपार/ई. यांनी राखुन ठेवण्यात आलेली आहे.

**सरपंच**
**ग्रा.पं.मुंडीपार/ई.**

**सचिव**
**ग्रा.पं.मुंडीपार/ई.**

